REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# मराठी रंगभूमीवरील नवीन नाट्य जाणीवांचा अभ्यास (व्यावसायिक व प्रायोगिक नाटकांच्या संदर्भात)




श्री.नवनाथ विश्वनाथ पाटोळे

## प्रस्तावना-

१९३० ते ६० दरम्यान मराठी नाटकांचे लेखन खूप कमी प्रमाणात झाले. १९६० ते १९६५ हा कालखंड मराठी नाटकांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा कालखंड आहे. या कालखंडानंतर ही इतर वाड्:मय प्रकाराच्या तुलनेत मराठी नाटकाला प्रेक्षक सापेक्ष प्रयोगक्षम कलेमुळे आशयाच्या दृष्टीने बदल घडण्यास उशिरा लागला. १९३३ साली नाट्यमन्वंतर या संस्थेने 'आंधळ्याची शाळा' या नाटकाचा प्रयोग केला होता. या नाटकानंतर पंधरा-वीस वर्षे मराठी रंगभूमीच्या दृष्टीने निराशाजनक ठरली. या दरम्यान जुन्याच नाटकाचे प्रयोग चालू होते. १९५६ मध्ये 'ललित कला केंद्र' नावाची नाट्यसंस्था स्थापन केली. त्यानंतर या संस्थेतून बाहेर पडून काही कलावंतांनी १९६० मध्ये 'रंगायन' नावाची नोंदणीकृत संस्था काढली. १९५४ साली महाराष्ट्र शासनाने नाट्यस्पर्धांचे आयोजन केल्याने मराठी रंगभूमीला उर्जितावस्था आली. यातूनच नवीन कलाकार उदयास आले. या सर्व वातावरणातूनच १९६० ते ६५ या कालखंडातील नाटकांच्या आशयाला प्रेरणा मिळाली.

## ➢ व्यावसायिक व प्रायोगिक नाटके

व्यावसायिक रंगभूमी व प्रायोगिक रंगभूमी या रंगभूमीच्या दोन मुख्यधारा असल्या तरी या कालखंडात व्यावसायिक रंगभूमीवर विशेष काही घडले नाही. या कालखंडात बरीचशी नाटके जुन्या नाटकांचा कित्ता गिरवणारी होती. काही नाट्यसंस्थांनी यात नाविण्य आणण्याचा प्रयत्न केला. या कालखंडातील पुढील गोष्टींमुळे आशय आणि आकृतिबंध यांच्यात बदल घडला.

### १) फार्सचा वापर

जुन्या मराठी नाटकांमध्ये फार्सचा वापर मूळ नाटकाची पूरके म्हणून केला जात होता. या कालखंडात बबन प्रभू व आत्माराव भेंडे यांनी स्वतंत्रपणे मराठी रंगभूमीवर फार्स हा नाट्यप्रकार आणला. 'झोपी गेलेला जागा झाला', 'दिनूच्या सासूबाई राधाबाई', 'माकड आणि पाचर', हे फार्स मराठी रंगभूमीवर आले. 'प्रेमा तुझा रंग कसा' ही सुखात्मिका नव्याने प्रेक्षकांसमोर आणली. या सर्व कारणांमुळे नाटकांकडे प्रेक्षकांचा बघण्याचा दृष्टिने बदलला.

### २) आधुनिक आशयाचा वापर

या कालखंडात ज्या नाटकांमध्ये आधुनिक आशयाचा आविष्कार झाला; त्या नाटकांचा आकृतिबंधही बदलून गेला. उदा: 'तू वेडा कुंभार', 'पहाटेची चाहूल', 'ससा आणि कासव' इ.

### ३) आधुनिक तंत्राचा वापर

या कालखंडात प्रकाश, नेपथ्य, ध्वनी इ. योजनांमध्ये तंत्र प्रगत झाले. त्यामुळे मराठी रंगभूमीच्या कक्षा रुंदावल्या. याविषयी सुषमा जोगळेकर म्हणतात, " सरकत्या रंगमंचाच्या उपलब्धीमुळे नाटककारांना स्थल वैचित्र्य दाखविणे शक्य झाले. प्रकाश योजना, नेपथ्य योजना यांच्या प्रगतीमुळे भासदृश्ये, स्वप्नदृश्ये, पूर्वदृश्ये दाखवणे शक्य झाले." (१) याचा फायदा घेऊन परिणामकारक नाट्यलेखन केले गेले. तंत्रांमध्ये आधुनिकीकरण आल्याने सामान्य दर्जाचा नाट्यानुभव उभी करणारी नाटके लिहिली. या सर्व गोष्टींचा परिणाम नाटकांवर झाला. त्यामुळे नाटकांत नाविण्यता येण्यास मदत झाली

### ४) इतिहास व पुराणे यावर आधारित नाटके

इतिहास व पुराणे यांच्यावर आधारित नाटके या कालखंडात आली. 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'मत्स्यगंधा', अशा नाटकांव्दारे नवीन आशय रंगभूमीवर मांडण्याचा प्रयत्न झाला. 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाविषयी वि.भा.देशपांडे म्हणतात, " 'रायगडा' हे कानेटकरांनी व्यावसायिक रंगभूमीसाठी लिहिलेले पहिले नाटक आहे. तिथले आडाखे, तंत्र यांचा परिचय नव्हता, अंदाज नव्हता," (२) त्याचप्रमाणे 'मत्स्यगंधा' या नाटकाविषयी वि.भा.देशपांडे म्हणतात, " 'मत्स्यगंधा' नाटक एका महत्त्वाच्या पुराणकथेवर आधारित आहे" (३) अशा प्रकारच्या नाटकांच्या आशयातून नवीन आकृतीबंध आणण्याचा प्रयत्न झाला.

### ➢ नाटकावर परिणाम करणारी नाट्यबाह्य स्थिती

या कालखंडाच्या अगोदर असणारी नाटकांतील बाह्यस्थिती कारणीभूत होती. १९६० च्या पूर्वी नाटकाला आलेली पठारावस्था याला कारणीभूत ठरली. त्याचप्रमाणे या कालखंडात नाट्य लेखनावर परिणाम झाला. १९३० च्य सुरुवातीच्या काळातील नाट्यबाह्य स्थितीचा परिणाम या कालखंडातील नाटकांवर झाला. नाटकांचा प्रेक्षकवर्ग त्याच्या नाटकांकडून असणाऱ्या अपेक्षांचा परिणाम या कालखंडातील नाटकांवर झाला.

त्याचप्रमाणे नाट्यपरंपरेने काही नाटके निर्माण झाली. आधुनिक व नवीन विशेषणे असलेल्या नाटकांची तुलना होऊ लागली. भूतकाळातून आलेल्या नाटकांची नवीन नाटकांबद्दल तुलना होऊन भूतकाळातील नाटकांत नाविण्यता आणली.

१९३५ ते ४० या नंतरचा कालखंड नाटकांच्या दुरावस्थेचा कालखंड होता. या काळात प्र.के.अत्रे यांची 'साष्टांग नमस्कार', 'उद्याचा संसार', 'घराबाहेर', 'लग्नाची बेडी', 'भा.वि.वरेरकर', यांची 'तुरुंगाच्या दारात', 'हाच मुलाचा बाप', 'संन्याशाचा संसार', 'सोन्याचा कळस', व मो.ग.रांगणेकर यांची 'कुलवधू', 'रंभा', 'एक होता म्हातारा', यांसारख्या नाट्यलेखकांनी मराठी रंगभूमीचे अस्तित्व टिकवले. १९४३ मध्ये मराठी रंगभूमीचे शताब्दी महोत्सवाचे वर्ष म्हणून आयोजित केले. यावेळी जून्या नाटकांबरोबरच नवीन नाटकांचे सादरीकरण करण्यात आले. परंतु विशाल जनसमुदायापुढे नवीन नाटकाचे सादरीकरण न केल्याने जून्याच नाटकांना लोकप्रियता मिळाली, कारण अशा ठिकाणी नाट्यलेखनात सूचित केलेली व नटांच्या वाचिक अभिनयातून, हालचालींतून व चेहऱ्यावरील हावभावातून प्रकट झालेली नैसर्गिकता, सूक्ष्मता जी नवीन नाटकांमध्ये होती. ती त्यांचा प्राणच होती. ती प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकली नाही. नाट्यगृह उघडे आहे की बंदिस्त यांचा परिणाम नाटकाच्या सादरीकरणावर झाला.

१९६० नंतर पुन्हा मराठी रंगभूमीच्या उत्कर्षाला सुरुवात झाली. सरकारी पातळीवरील उत्तेजन याला कारणीभूत होते. १९६० नंतर पुन्हा नव्या जोमाने नवीन विषय मराठी रंगभूमीवर नवीन नाटके आली. त्यामुळे प्रेक्षकांचा या नाटकांना भरपूर प्रतिसाद मिळू लागला. व्यावसायिक नाटककारांनी नाटकांमध्ये गुंतवणूक केल्याने त्यामध्ये भरपूर प्रमाणात सुधारणा झाली. या सर्व गोष्टींमुळे मराठी रंगभूमीच्या प्रायोगिक व व्यवसाय क्षेत्रात नाविण्यता आली.

### ● संदर्भ :

**१)** जोगळेकर सुषमा, आधुनिक मराठी नाटक, गोकुळ मासिक, प्रकाशन, पुणे-३०.प्रथमावृत्ती १९९६, पृ४२
२) देशपांडे वि.भा.भावलेली नाटके, श्रीपाद प्रकाशन, पुणे-०२, प्रथमावृत्ती २००२, पृ.४७.
३) तत्रैय पृ.३५.